# गुरुमहिमा

गुरु: ब्रह्मा गुरु: विष्णु गुरुर्देवो महेश्वरा: ।
गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम: ।।

देवत्वाकडे जाण्याचे माध्यम म्हणजे गुरु. गुरुची सेवा करून शिष्य नम्रता, जिज्ञासा, भक्तीद्वारे गुरुजवळचे ज्ञानामृत मिळवतो व ते प्राशन करून स्वत:ची उन्नती करून घेतो. गुरुकृपेमुळेच शिष्याच्या मनाची मलिनता दूर होते. जीवनात वाटचाल करतांना आपण कुठे अडलो, पडलो तर गुरु आपल्याला मार्गदर्शन करतात. जीवनाला योग्य दिशा देतात. "गुरु बीन कौन बतावे वाट ? किंवा 'गुरुविण नाही दुजा आधार" असे म्हणूनच म्हणतात. आपल्या भारतीय संस्कृतीत सुध्दा गुरुचा मोठेपणा सांगितला आहे.

गुरु हे ईश्वराच्या कार्यासाठी स्वत: झिजून जगात आनंद, शांती पसरवतात. गुरु केवळ वाणीने नव्हे तर स्वत:च्या वर्तनाने उपदेश करीत असतात. शिष्याची कुवत पाहून गुरु ज्ञानदान करीत असतात. त्यांचा अनुग्रह असल्याशिवाय ज्ञानप्राप्ती होत नाही. गुरु आपल्या ज्ञानीतले ज्ञान देतांना थकत नाही तसेच सत्कार्यासाठी संकटे सोसूनही गुरु सदैव तत्पर असतात.

गुरु परंपरा फार प्राचीन काळापासून आहे. उदा. विश्वामित्र ऋषी राम लक्ष्मणाचे गुरु, राजा दशरथाचे गुरु वसिष्ठ ऋषी, श्रीकृष्ण-बलरामचे गुरु सांदिपनी ऋषी, अर्जुनाचे गुरु द्रोणाचार्य, धौम्य ऋषींचा शिष्य आरुणी, परशुरामांचा शिष्य कर्ण इ. गुरु शिष्यांच्या जोड्या प्रसिध्द आहेत. पाश्चात्य राष्ट्रातही सॉक्रेटिसचा शिष्य प्लेटो व प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल अशी गुरुपरंपरा आहे. अर्जुनाचा मोह टाळण्यासाठी भगवान कृष्णांनी गीतेचे १८ अध्याय सांगितले

P.T.O.

गुरु हाच परमेश्वर आहे. गुरु माऊली आपल्या शिष्यांसाठी सदैव कृपेची सावली देत असते. गुरु म्हणजे त्रैलोक्याचा आधार असतो. "गुरु तोचि देव, ऐसा ठेवी भाव" असे संतांनी सांगितले आहे. परिसाच्या स्पर्शाने जसे लोखंडाचे सोने बनते त्याचप्रमाणे गुरूच्या कृपाप्रसादाने शिष्याच्या आयुष्याचे सोने होते. भक्तिभावाने गुरुला शरण गेले की ब्रह्मानंदाची प्राप्ती होते. स्वस्वरूपाची ओळख होते.

आणि म्हणूनच व्यासपौर्णिमेला - गुरुपौर्णिमेला गुरूची पूजा केली जाते. महर्षी व्यासांना हिंदू धर्माचे पिता मानले जाते. ते जीवनाचे खरे भाष्यकार होते; समाजाचे गुरु होते. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या गुरूस सदैव स्मरणात ठेवावे. त्यांची कृपादृष्टी लाभली की 'गुरुकृपांजन पायो मेरे भाई' असा आनंदाचा ठेवा आपल्या हाती येतो. शिष्याला स्वतःच्या प्रतिमा-मूर्तीरूपात तयार करणारा गुरु निरुपम आहे. गुरु साक्षात परब्रह्म असल्यामुळे गुरूचे पूजन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते !!

सौ विजया पुरुषोत्तम जोशी.



